## सीमोल्लंघन

सीमोल्लंघन कशासाठी ?
विजयादशमीच्या स्मरणासाठी
कडू विषारी आठवणींना
मुळासकट गाडण्यासाठी
दुरितांच्या अज्ञानाला
हाती कंदील देण्यासाठी
आप्त-मित्रांच्या कारवाया
पाठीमागेच ठेवण्यासाठी
सुंदर पवित्र उदात्ततेला
अवघे पंखी घेण्यासाठी
भूत विसरून भावीसाठी
वर्तमानातच जगण्यासाठी
मुंगी मतीची उंच उडी मग
अवघी झाली गगन कडी

**जयश्री माने**